<u>प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यासाठी मागणीपत्र</u>

**क्रमांक : प्रबोधिनी/आस्थापना/प्रतिनियुक्ती पदे/९२६/२०२४, दि. २४.०६.२०२४.**

**डॉ. पंजाबराव देशमुख विदर्भ प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी, अमरावती**

डॉ.पंजाबराव देशमुख विदर्भ प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी, अमरावती या संस्थेमध्ये राज्य प्रशिक्षण धोरण २०११ नुसार राज्य प्रशिक्षण कार्यक्रम अंतर्गत शासन सेवेतील अधिकारी वर्ग-२ व वर्ग-३ च्या कर्मचाऱ्यांसाठी प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात येतात. शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग/कार्या.१२अ, मंत्रालय, मुंबई यांच्या दि. ११ मे, २०१५ मध्ये नमूद केलेली पदे भरण्याची कार्यपध्दती व प्रतिनियुक्तीने भरण्यात येणाऱ्या पदांच्या कर्तव्ये व जबाबदाऱ्या विहित केल्या आहेत.

त्यास अनुसरुन शासन सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई या विभागाच्या अधिपत्याखालील डॉ. पंजाबराव देशमुख विदर्भ प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी, अमरावती या कार्यालयातील राज्य प्रशिक्षण कार्यक्रम अंतर्गत खालील नमूद केलेली पदे शासकीय अधिकारी/कर्मचारी यांचे मधून प्रतिनियुक्तीने भरण्यासाठी विहीत नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहेत. अशा संवर्गात इच्छूक किंवा पात्र उमेदवार न मिळून आल्यास निम्न संवर्गात व श्रेणीमध्ये समकक्ष पदावरील पदोन्नतीसाठी विहित केलेली अर्हता व अनुभव पूर्ण करणाऱ्या शासकीय अधिकारी/कर्मचारी यांचाही या पदावर प्रतिनियुक्तीसाठी विचार केला जाईल.

| अ.क्र. | पदनाम | गट | पदांची संख्या | पदांची वेतनश्रेणी |
|---|---|---|---|---|
| १ | निबंधक तथा सहायक प्राध्यापक वर्ग-१ | अ | १ | १५६००-३९१०० (ग्रेड पे -५०००) एस-१९-५५१००-१७५१०० |
| २ | सहायक प्राध्यापक वर्ग-१ | अ | ५ | १५६००-३९१०० (ग्रेड पे-५०००) एस-१९-५५१००-१७५१०० |
| | १ ग्राम-कृषी विकासाशी संबंधीत- २ पदे | | | |
| | २ समाजकल्याण व आदिवासी विकास संबंधीत -१ पद | | | |
| | ३ नागरी विकास संबंधीत -१ पद | | | |
| | ४ अभियांत्रिकी व आरोग्य सेवे संबंधीत- १ पद | | | |
| ३ | वसतिगृह तथा आवार व्यवस्थापक वर्ग-३ | क | १ | ९३००-३४८०० (ग्रेड पे ४२००) एस-१३-३५४००-११२४०० |
| ४ | कार्यालयीन अधिक्षक/स्टेनो वर्ग-३ | क | १ | ९३००-३४८०० (ग्रेड पे ४२००) एस-१३-३५४००-११२४०० |
| ५ | ग्रंथपाल | क | १ | ५२००-२०२०० (ग्रेड पे २४००) एस-८-२५५००-८११०० |
| | एकूण | | ०९ | |

२. प्रतिनियुक्तीने नियुक्ती प्रथमत: तीन वर्षाच्या कालावधीसाठी राहील, तद्नंतर आवश्यकता विचारात घेऊन संबंधीत अधिकारी यांची इच्छुकता व प्रतिनियुक्तीने सेवा देणाऱ्या संवर्ग नियंत्रण प्राधिकाऱ्याच्या सम्मतीने हा कालावधी जास्तीत जास्त ५ वर्षापर्यंत वाढविता येईल.

३. सर्व विभागांना विनंती करण्यात येते की, सदर परिपत्रक त्यांच्या अधिपत्याखालील कार्यरत असलेल्या वर नमूद केलेल्या संवर्गातील सर्व अधिकारी यांच्या निदर्शनास आणण्यात यावे.

४. सदर पदावर प्रतिनियुक्तीने नियुक्तीसाठी इच्छुक व पात्र अधिकारी/कर्मचारी यांनी त्यांचे अर्ज सोबत जोडलेल्या विहित नमून्यात टंकलिखित करुन त्यांच्या प्रशासकीय विभागामार्फत निम्न स्वाक्षरीतांकडे **दि.२३/०७/२०२४** पर्यत पोहचतील अशा बेताने पाठवावे.

५. प्रतिनियुक्तीने नियुक्ती घेऊ इच्छिणाऱ्या अधिकारी/कर्मचारी यांनी ते सद्या शासन सेवेत असल्याबाबतचे त्यांच्या कार्यालय प्रमुखांचे प्रमाणपत्र अर्जासोबत जोडावे.

६. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग (कार्या-१२) , दि.१७.१२.२०१६ व समक्रमांक दि.१६.०२.२०१८ व साप्रवि/ (कार्या-१२-अ), दि.११.०५.२०१५ मधील निर्धारित तरतुदी, अटी व शर्तीनुसार प्रतिनियुक्तीने नियुक्ती देण्याबाबत अर्जाची तपासणी करण्यात येईल.

७. प्रशासकीय विभागांनी/संवर्ग नियंत्रक विभागांनी परिपूर्ण स्वरुपातील अर्ज त्यांचे आवश्यक प्रमाणपत्रांसह व संबंधीत अधिकारी/कर्मचारी यांच्या मागील ५ वर्षाचे गोपनीय अहवालाच्या सत्यप्रतीसह या विभागाकडे कोणत्याही परिस्थितीत **दि.२३/०७/२०२४** पर्यंत पाठवावेत. विहित मूदतीत अर्ज प्राप्त न झाल्यास अशा अधिकारी/कर्मचारी यांचा विचार केला जाणार नाही.

८. अंतिम दिनांकास प्राप्त अर्जांची छाननी केल्यानंतर पात्र अर्जाबाबत प्रस्ताव सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मंबई यांचेकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात येईल.

-सही-
संचालक
डॉ.पंजाबराव देशमुख विदर्भ प्रशासकीय
व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी, अमरावती.

६८

## महाराष्ट्र शासन

## सामान्य प्रशासन विभाग (कार्या-१२अ)

## परिशिष्ट - क

## प्रतिनियुक्तीने नियुक्तीसाठी अर्जदारांनी सादर करावयाचा अर्जाचा नमुना

१. नाव (संपूर्ण नाव) ________________

२. ज्या पदासाठी अर्ज केला आहे ते पद व ________________

कार्यालयाचे नाव :________________

३.(अ) सध्या धारण केलेले पद व पदस्थापनेचे ठिकाण :________________

(ब) वेतनश्रेणी ________________

४. सध्या कार्यरत असलेल्या पदाचा संवर्ग नियंत्रक विभाग : ________________

५. जन्म दिनांक :________________

६. अर्ज सादर करणेचे अंतिम दिनांकास वय (वर्ष व महिना) ________________

७. शैक्षणिक अर्हता ________________ :

८. मागासवर्गीय असल्यास प्रवर्ग : ________________

९. सध्या धारण केलेले पद नियमित आहे किंवा :________________

तात्पुरते आहे. नियमित असल्यास नियमित दिनांक ________________

१० घोषित केलेला स्वग्राम तालुका व जिल्हा ________________ :

११. शैक्षणिक अर्हता व अनुभव :

शैक्षणिक अर्हता : १.________________

: २.________________

: ३.________________

अनुभव : १.________________

: २.________________

३.________________

F:\MTDR.doc

१२. आतापर्यंत केलेल्या सेवेचा तपशील :

(जागा कमी असल्यास स्वतंत्र विवरणपत्र जोडावे व

त्यावर स्वतःची स्वाक्षरी करावी)

| कार्यालय/विभाग | पद ( संवर्ग अथवा प्रतिनियुक्तीवर) | कालावधी | | वेतनश्रेणी | कामाचे स्वरुप |
|---|---|---|---|---|---|
| | | पासून | पर्यंत | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

१३. संपर्क तपशील ——

(अ) पत्ता :- ____________________

____________________

____________________

दूरध्वनी क्र. ____________________

ई मेल ____________________

भ्रमणध्वनी क्रमांक ____________________

(ब) कार्यालयीन पत्ता :- ____________________

____________________

दूरध्वनी क्र ____________________

ई मेल ____________________

मी श्री/श्रीमती ____________________ असे प्रमाणित करते/करतो की, मी प्रतिनियुक्तीने भरावयाच्या पदांच्या मागणीपत्रातील तपशील वाचले असून ,सदर पदासाठी विहित केलेल्या अर्हता मी धारण करीत असल्याने सदर पदावर प्रतिनियुक्तीने नियुक्तीसाठी अर्ज सादर करीत आहे. अर्जात नमूद केलेली माहिती खरी असून ,खोटी आढळून आल्यास माझा अर्ज नाकारला जावू शकतो याची मला जाणीव आहे.

सही/ ____________________

नाव ____________________

पदनाम ____________________

= ८०९
८३

<u>प्रशासकीय विभाग व संवर्ग नियंत्रक विभागाने भरावयाचा तपशिल</u>

प्रमाणित करण्यात येते की,

१. श्री/श्रीमती ______________ पद ______ यांनी सादर केलेला अर्ज तपासला असून त्यांनी अर्जामध्ये दिलेली माहिती सेवा अभिलेखानुसार बरोबर आहे.

२. श्री/श्रीमती ______________ पद ______ यांची प्रतिनियुक्तीच्या पदासाठी निवड झाल्यास त्यांना प्रतिनियुक्तीच्या पदावर हजर होण्यासाठी कार्यमुक्त करण्यात येईल.

३. श्री/श्रीमती ______________ पद ______ यांचेविरुध्द मनासे (शिस्त व अपील) नियम १९७९ मधील नियम ८ नुसार कोणतीही विभागीय चौकशी सुरु नाही अथवा त्यांचेविरुध्द भ्रष्टाचार/लाचलूचपत गुन्ह्यासंदर्भातील प्रकरण, फौजदारी प्रकरण प्रलंबित नाही.

४. श्री/श्रीमती ______________ पद ______ यांचेविरुध्द कोणत्याही शिक्षेची अंमलबजावणी चालू नाही.

५. श्री/श्रीमती ______________ पद ______ यांना मागील १० वर्षाच्या कालावधीमध्ये झालेल्या गंभीर अथवा किरकोळ शिक्षेचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| पद | शिक्षेचे स्वरुप | शिक्षा संपुष्टात आल्याचा दिनांक |
|---|---|---|
| | | |
| | | |

६. प्रमाणित करण्यात येते की, श्री/श्रीमती ______________ हे कार्यरत असलेल्या संवर्गामध्ये अर्ज अग्रेषित करण्याच्या दिनांकास १० टक्के पेक्षा अधिक पदे रिक्त नाहीत.

७. श्री/श्रीमती ______________ यांना प्रतिनियुक्तीने ______ या पदावर ______ ______ या कार्यालयात नियुक्ती करण्यास या विभागाची हरकत नाही.

८. श्री/श्रीमती ______________ यांच्या उपलब्ध असलेल्या मागील ५ वर्षाच्या गोपनीय अहवालाच्या सत्यप्रती सोबत जोडून पाठविण्यात येत आहेत.

सही/-

दिनांक ______

(नाव ______)

पदनाम______

______विभाग

FAwww.docx